ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
जा.क्र.नासुके/१/कावि/ 38 /२०१३
दि. 28/१/२०१४

**विषय :- क्षेत्रीय कार्यालयातील नागरी सुविधा केंद्राचे कामकाजाबाबत. . .**

**परिपत्रक,**

आदेश क्र.प्रशा/२/कावि/४१/२०१४ दि.२१/१/२०१४ अन्वये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१२ नुसार ६४ निवडणूक प्रभागांची विभागणी करुन ६ क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना करणेत आली आहे. यापैकी दोन क्षेत्रीय कार्यालयाचे कामकाज दि.२७/०१/२०१४ पासून सुरु करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत अ,ब,क,ड या ४ क्षेत्रीय कार्यालयाचे ठिकाणी नागरी सुविधा केंद्राचे कामकाज सुरु आहे. इ व फ या नविन क्षेत्रीय कार्यालयासाठी नागरी सुविधा केंद्र सुरु करण्याची कार्यवाही ई-गव्हर्नन्स विभागाकडून प्रस्तावित आहे.

तथापि नविन क्षेत्रीय कार्यालयाचे ठिकाणी नागरी सुविधा केंद्र सुरु होईपर्यंत, नागरिकांकडून विविध दाखले / परवाने करिता, अर्ज स्वीकारणे, अर्ज संबंधित क्षेत्रीय कार्यालय येथे पाठविणे, तयार झालेले दाखले / परवाने वितरित करणे, इ.कामकाज सक्षमरित्या पार पाडावे म्हणून खालीलप्रमाणे कार्यवाही सर्व क्षेत्रीय कार्यालयामार्फत करणेत यावी.

१) अ,ब,क व ड या क्षेत्रीय कार्यालयातील **नागरी सुविधा केंद्रामध्ये** पुर्वीच्या प्रभाग रचनेप्रमाणेच नागरिकांचे अर्ज स्वीकारणेत यावे.

२) क्षेत्रीय कार्यालयाचे निवडणूक प्रभाग जुन्या रचनेत ज्या दुस-या क्षेत्रीय कार्यालयात येत आहे त्या क्षेत्रीय कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रामधून टपाल ने-आण करण्यासाठी कर्मचा-यांची नेमणूक संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी करावी.

क्षेत्रीय कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रामार्फत नागरिकांना सेवा-सुविधा देणेबाबत अडचणी निर्माण झाल्यास त्याचे तातडीने निराकरण करण्याची दक्षता सर्व क्षेत्रीय अधिका-यांनी घ्यावी.

**सहा. आयुक्त (ना.सु.कें.)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका